## धर्मप्रांतीय उपासना आयोग, वसई

### पवित्र कुटुंबाचा सण - २७ डिसेंबर २०२०

### श्रद्धावंतांच्या प्रार्थना

**धर्मगुरू** : माझ्या बंधू भगिनींनो, आमच्या तारणा-या परमेश्वराची दया आणि प्रेम आम्हामध्ये प्रकट झाले आहे. आपल्या स्वतःच्या सत्कृत्यांवर नव्हे तर अखिल मानवजातीवरील त्याच्या प्रेमावर विश्वास ठेऊन आपण आपल्या प्रार्थना परमेश्वराला अर्पण करू या.

**प्रतिसाद** : **प्रभो, आमची प्रार्थना ऐक.**

१. आपले पोप फान्सिस, आर्चबिशप फेलिक्स, धर्मगुरू व व्रतस्थ ह्यांना वैश्विक ख्रिस्तसभा कुटुंबाला सतत मार्गदर्शन करण्यासाठी पवित्र आत्म्याची कृपा व चांगले आरोग्य लाभावे म्हणून आपण प्रार्थना करू या.

२. आपल्या देशातील विविध धर्मिय कुटुंबामध्ये प्रेमाचे, शांतीचे आणि क्षमेचे वातावरण निर्माण व्हावे व आपल्या राजकीय नेत्यांनी देशाचा कारभार पाहत असताना कौटुंबिक स्वास्थाकडे अधिक लक्ष द्यावे म्हणून आपण प्रार्थना करू या.

३. नाझरेथ येथील बालक कुटुंबामध्ये वाढत वाढत, बलवान होत व ज्ञानाने परिपूर्ण होत गेले. ह्याच पवित्र कुटुंबाने घालून दिलेल्या आदर्शाप्रमाणे जीवन जगण्यास, आपल्या कुटुंबातील प्रत्येक घटकात स्नेहभाव निर्माण करण्यास व मुलांची योग्य ती जडणघडण करण्यास आपल्याला कृपा मिळावी म्हणून आपण प्रार्थना करू या.

४. आपल्या धर्मग्रामातील ज्या दाम्पत्यांनी त्यांच्या वैवाहिक जीवनाची २५ आणि ५० वर्षाची वाटचाल पूर्ण केली आहे अशांवर परमेश्वराचा कृपा वरदहस्त राहावा व ईश्वराच्या कृपेने त्यांना सतत प्रेमाचे आणि सहकार्याचे वातावरण अनुभवयास मिळावे म्हणून आपण प्रार्थना करू या.

५. प्रभूच्या सामर्थ्यशाली कृपेचा स्पर्श गरीब, आजारी, निराश्रित व निराधार लोकांना घडावा, कोरोना विषाणुपासून व सर्व प्रकारच्या नैसर्गिक आपत्तीपासून आपले रक्षण व्हावे तसेच उद्या / आज विवाहबद्ध होणा-या वधूवरांवर परमेश्वराचा आशीर्वाद यावा म्हणून आपण प्रार्थना करू या.

थोडावेळ शांत राहून आपण आपल्या वैयक्तिक हेतूंसाठी प्रार्थना करू या.

**धर्मगुरू** : हे प्रभो परमेश्वरा, प्रेमाने आणि आपले कौमार्य न गमावता मरियेने आमचा प्रभू आणि तुझा पुत्र येशू ख्रिस्त ह्याला जन्म दिला. तिला आमच्या प्रार्थना तुझ्यासमोर सादर करू दे. ही प्रार्थना आम्ही आमच्या प्रभूख्रिस्ताद्वारे करतो.